ARTHA (Commercial Weekly) Poona 4.

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : १२ नये पैसे
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3484. Licence No. 53.

वर्ष २६ | पुणें, बुधवार तारीख ६ एप्रिल, १९६० | अंक १४

## विविध माहिती

**पंडित नेहरूंचा धर्म**—फेडरेशन ऑफ चेंबर्स ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीज ह्या संघटनेच्या वार्षिक अधिवेशनांत पंतप्रधान पं. नेहरू म्हणाले "भारतामधील सामान्य जनतेवर, विशेषतः शेतकऱ्यांवर माझी श्रद्धा आहे. त्यांच्या-माझ्यामधील प्रेमाच्या नात्यामुळेंच माझ्यावर पडलेल्या जबाबदाऱ्या व कामें मी पार पाडूं शकलों आहें. माझ्या पुरतें बोलावयाचें झाल्यास हा धर्म मला पुरेसा आहे.

**अहमदाबाद जिल्ह्यांतील सहकारी संस्था**—अहमदाबाद जिल्ह्यांत १,७०० सहकारी संस्था आहेत. त्यांपैकी ५०० घरबांधणीच्या आहेत, १०० औद्योगिक सहकारी संस्था आहेत, १०० सहकारी शेती संस्था आहेत आणि ३०० विविध कार्यकारी सहकारी संस्था आहेत. शेती सहकारी संस्थांना १·६५ कोटी रुपये कर्जाऊ देण्यांत आले होते. ते बहुतेक संस्थांनीं परत फेडले आहेत.

**सुजाता बोलपटाला बक्षीस**—अस्पृश्यतेच्या प्रश्नावरील सर्वांत उत्तम चित्रपट म्हणून 'सुजाता' चित्रपटाला मुंबई सरकारनें २५,००० रुपयांचें बक्षीस जाहीर केलें आहे. बक्षिसाची रक्कम नॅशनल सेव्हिंग्ज सर्टिफिकेट्सच्या रूपानें देण्यांत येणार आहे. चित्रपटाचे निर्माते विमल रॉय हे आहेत.

**लेनिनच्या रहात्या घराला भेट**— रशिआचे पंतप्रधान मि. क्रुश्चेव्ह ह्यांनीं आपल्या फ्रान्समधील दौऱ्यांत लेनिन ज्या घरांत राहत होता त्या घराला भेट दिली. हें घर दोन खोल्या व स्वयंपाकघर इतकेंच मोठें आहे. १९०९ ते १९१२ पर्यंत रशियन क्रांतीचा नेता लेनिन येथें राहत असे. राजकीय निर्वासित म्हणून लेनिन बराच काळ रशिआबाहेर असे.

**रॉकेलच्या वांटपाची व्यवस्था**— मद्रास राज्यांतील ग्रामीण विभागांतील रॉकेलच्या वांटपाची व्यवस्था सहकारी संस्थांच्या मार्फत करण्यांत यावी अशी सूचना मध्यवर्ती सरकारनें केली आहे. लोकांना रोजच्या गरजा भागविण्यासाठी लागणाऱ्या वस्तु सहकारी संस्थांमार्फत वांटण्यांत याव्यांत असें मध्यवर्ती सरकारचें मत आहे.

**नगर शहराचा पाणीपुरवठा**—नगर शहराला भासणारें पाण्याचें दुर्भिक्ष्य नष्ट करण्यासाठी शहरापासून १४ मैलांवर नदीला धरण बांधण्याची योजना नगरच्या नगरपालिकेनें तयार केली आहे. योजनेसाठी ५० लाख रुपये खर्च येणार आहेत. ह्याबाबत उभाराव्याच्या कर्जाची हमी सरकारनें घ्यावी असें सुचविण्यांत आलें आहे.

**हुंड्याविरुद्ध बंड**—जबलपूर येथें एका सुशिक्षित वधूनें हुंडा मागणाऱ्या वराची फजिती केली. वधूच्या बापानें वरपक्षाला १,००० रुपये हुंडा देण्याचें कबूल केलें होतें. पण लग्नसमारंभासाठी आलेल्या वऱ्हाडी मंडळींत उभे राहून, वधूनें हुंडा घेणाऱ्या नालायक वराशीं विवाह करण्यास जाहीर नकार दिला.

**शेतकऱ्यांसाठी विश्रांतिगृह**—म्हैसूर राज्यांतील नवलगुंद तालुक्यांतील अण्णिगिरी येथें शेतकऱ्यांसाठी एक विश्रांतिगृह बांधण्यांत आलें आहे. रयत संघ ह्या संस्थेनें ६०,००० रुपये खर्चून तें बांधलें आहे. वरील गांवाच्या आसपासच्या खेड्यांतील शेतकरी येतील तेव्हां त्यांना त्याचा चांगला उपयोग होईल.

**कॅन्सरच्या रोग्यांसाठी इस्पितळें**—कॅन्सरच्या रोग्यांना उपचार करण्यासाठी मध्यप्रदेश सरकारनें इंदोर, जबलपूर, भोपाळ आणि ग्वाल्हेर ह्या ठिकाणीं इस्पितळें काढण्याचें ठरविलें आहे. ह्या योजनेसाठी राज्य सरकारनें १० लाख रु. मंजूर केले आहेत. सर्व इस्पितळें आधुनिक उपकरणांनीं सज्ज करण्यांत येतील. ह्या कामीं मध्यवर्ती सरकारहि आर्थिक मदत देणार आहे.

**सिनेमा नटांचा संप मिटला**—हॉलिवुडमधील सिनेनटांची संघटना आणि चित्रपट निर्माण करणाऱ्या कंपन्या ह्यांच्यांत तडजोड झाल्यामुळें नटांनीं आपला संप मागें घेतला आहे. नट सेवानिवृत्त झाल्यानंतर त्यांना मदत देण्यासाठी एक फंड निर्माण करण्याचें कंपन्यांनीं मान्य केलें. हा फंड ३० लाख डॉलर्सचा असेल. त्याशिवाय नटांच्या पगारांतहि वाढ करण्यांत आली आहे.

**पंजाबची गव्हाची खरेदी**—राज्यांतील धान्याचा व्यापार ताब्यांत घेण्याच्या दृष्टीनें पंजाब सरकारनें गव्हाची खरेदी करण्याची तयारी चालविली आहे. पुढील तीन आठवड्यांत बाजारांत नवा गहूं विक्रीसाठी येऊं लागेल. आतांपर्यंत शेतकऱ्यांनीं अधिक किंमतीच्या आशेनें गहू विक्रीस काढला नव्हता. पण आतां ते गहूं विकू लागले आहेत.


**कोळसा-कामगारांचा दौरा**—धनबाद येथील कोळशाच्या खाणींत काम करणारे ६०० कामगार भारताच्या दौऱ्यावर निघाले आहेत. त्यांत ७० स्त्रिया आहेत. प्रत्येक कामगाराला अन्न व वरखर्चासाठी फक्त ५० रुपये द्यावे लागले. कामगारांच्या प्रवासाचा खर्च कोळसा-कामगार हितसंवर्धक संघटनेनें केला. रेल्वेच्या भाड्यासाठी ३५,००० रुपये खर्च झाला.

**टिकाऊ अन्नपदार्थ**—टिकाऊ अन्नपदार्थ तयार करण्याच्या व डबाबंद मासे व माशांचे पदार्थ तयार करण्याच्या धंद्याला अमेरिकेच्या इंपोर्ट-एक्सपोर्ट बँकेकडून आर्थिक मदत मिळण्याचा चांगलाच संभव आहे. ह्या धंद्याला भारतांत बराच वाव असल्याचें तज्ज्ञांचें मत आहे. जरूर ती यंत्रसामुग्री आयात करण्यास भारत सरकारहि परवानगी देईल.

**उत्तर प्रदेशाच्या सरहद्दीवरील रस्ते**—उत्तर प्रदेश व तिबेट ह्यांच्या दरम्यान २५० मैल लांबीची सरहद्द आहे. सरहद्दीवरील दळणवळणाचीं साधनें सुलभ करण्यासाठी उत्तर-प्रदेश सरकार ३५ कोटी रुपये खर्च करणार आहे. राज्य-सरकारच्या ह्या कार्यक्रमांत रस्तेबांधणी, पूलबांधणी व नव्या इमारती ह्यांचा समावेश आहे.

**भारतीय वाद्यांची भेट**—मॉस्कोमधील सरकारी नाट्य-संस्थेला भारतीय वाद्यांचा एक संच भेट म्हणून देण्यांत आला आहे. ही संस्था लेनिनच्या एका जवळच्या सहकाऱ्यांच्या स्मरणार्थ स्थापन करण्यांत आलेली आहे. संस्थेतर्फे भारतीय नाट्यनृत्याचा एक कार्यक्रम सादर करण्यांत येणार आहे. त्यावेळीं ह्या वाद्यांचा उपयोग करण्यांत येईल.

**अहमदाबाद बस-सर्व्हिस**—अहमदाबाद म्युनिसिपल कॉर्पोरेशननें शहरांतील बस-वहातुकींच्या दरांत वाढ करण्याचें ठरविलें आहे. गेल्या १३ वर्षांत वाहतुकीच्या दरांत कांहींच वाढ करण्यांत आलेली नाहीं. दरम्यान बस-सर्व्हिस चालविण्याचा खर्च मात्र वाढत गेला. त्यामुळें कॉर्पोरेशनला फार मोठा तोटा सोसावा लागत आहे.

किर्लोस्कर
स्थापना १८८८
इलेक्ट्रिक पंपिंग सेट

भारतीय शेतकरी आपल्या शेतीला पाणी पुरवठा करण्यासाठीं किर्लोस्कर पंपिंग सेटची निवड करतात. कारण ते अधिक काटकसरी, कार्यक्षम व खात्रीलायक आहेत. आपल्या कामीं योग्य आकाराच्या पंपाची निवड करून त्याचा भरपूर मोबदला मिळवा.
किर्लोस्कर ब्रदर्स लि. किर्लोस्करवाडी (द. सातारा)

महाराष्ट्रांतील लहानमोठ्या उद्योगधंद्यांची आर्थिक अडचण तत्परतेनें दूर करून
महाराष्ट्राच्या औद्योगिक विकासास संपूर्ण साह्य करणारी
(शिड्यूल्ड बँक) दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रिअल बँक लि. पुणें (स्थापना १९३६)
मुख्य ऑफिस :—प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग, थोरले बाजीराव रस्ता, पुणें २. (फोन नं. ६५६३)
मुंबई शाखा :—८९ मेडोज स्ट्रीट, फोर्ट, मुंबई १. (फोन नं. २५३४०८)
: संचालक मंडळ :
श्री. छोटालाल धरमसी जोशी (प्रोप्रायटर–कमलाकांत छोटालाल अँड को. (इम्पोर्टर्स, एक्सपोर्टर्स मुंबई) अध्यक्ष.
श्री. गणेश उद्धव चितळे (सुपरिंटेंडेंट, पैसाफंड कांच कारखाना) उपाध्यक्ष.
श्री. गणेश रामचंद्र साठे (डायरेक्टर, साठे बिस्किट अँड चाकोलेट कं. लि. पुणें)
श्री. चिंतामण त्रिंबक चितळे (ऑ. सेक्रेटरी, पैसाफंड ग्लास वर्क्स, तळेगांव)
श्री. वासुदेव पांडुरंग वैद्य (इलेक्ट्रिकल व मेकॅनिकल इंजिनियर)
श्री. विनयकुमार नारायण सरदेसाई (मॅ. डायरेक्टर, एशियाटिक इंडस्ट्रिअल एजन्सीज लि. मुंबई)
श्री. सदाशिव कृष्णाजी भागवत (प्रोप्रायटर, राम एजन्सी) पुणें.
श्री. मोहनलाल हंसराज लुनावत (व्यापारी) पुणें.
★ बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. ★
मुदत ठेवींवरील आकर्षक व्याजाच्या नवीन योजनेबाबत समक्ष भेटा.
—बी. वाय. पाठक, ऑ. मॅनेजर.

# अर्थ

बुधवार, ता. ६ एप्रिल, १९६०





संस्थापक : प्रा. वामन गोविंद काळे

संपादक : श्रीपाद वामन काळे


### अविकसित देशांच्या प्रश्नांचा अभ्यास

अमेरिकन सिनेटच्या परराष्ट्रीय संबंध समितीच्या माहितीसाठी, आशिआंतील अविकसित देशांच्या प्रश्नांचा अभ्यास करणारा एक अहवाल नुकताच प्रसिद्ध करण्यांत आला आहे. हा अहवाल मॅसेच्युसेट इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलजी ह्या संस्थेच्या आंतरराष्ट्रीय विभागातर्फे तयार करण्यांत आलेला आहे. अविकसित देशांच्या व विशेषतः भारताच्या दृष्टीनें तो महत्त्वाचा आहे. प्रत्येक अविकसित देशाच्या सामाजिक, आर्थिक व राजकीय प्रश्नांचा अहवालांत विचार करण्यांत आला आहे. पण अहवाल येथेंच थांबलेला नाहीं. विशिष्ट अविकसित देशाच्या परिस्थितीचा अमेरिकेच्या धोरणावर कसा परिणाम होऊं शकेल ह्याविषयींहि त्यांत दिग्दर्शन करण्यांत आलें आहे. अविकसित देशांचें वर्गीकरण पद्धतशीर रीतीनें करण्यांत आलेलें असून प्रत्येक देशाचा आधुनिक आर्थिक युगांत प्रवेश होण्यापूर्वी कोणते मोक्याचे प्रश्न आधी सोडविणें जरूर आहे त्याची कल्पनाहि देण्यांत आलेली आहे. भारताच्या आर्थिक अवस्थेचें वर्णन करतांना अहवाल म्हणतो कीं स्वतःच्या बळावर आर्थिक प्रगति एकसारखी चालू ठेवण्यासाठी ज्या परिस्थितीची आवश्यकता असते ती परिस्थिति भारतानें आतां बऱ्याच अंशीं निर्माण केली आहे. अशा अवस्थेप्रत आलेल्या देशांना स्वतःची साधनसंपत्ति वाढविण्याच्या दृष्टीनें परदेशी भांडवलाच्या सहकार्याची फार आवश्यकता असते. बिगर-कम्युनिस्ट देशांनीं भारतामधील खाजगी मालकीच्या उद्योगधंद्यांना सध्यांच्या आणीबाणीच्या वेळीं मदत करणें फार अगत्याचें आहे. भारतामधील खाजगी उद्योगधंद्यांनीं गेल्या कांहीं वर्षांत चांगली धडाडी दाखविली आहे.

### गौळवाड्यांची प्रगति

मध्यवर्ती सरकारच्या अन्न व शेतकी खात्यातर्फे देशांतील गौळवाड्यांच्या प्रगतीची माहिती जाहीर करण्यांत आली आहे. देशांतील निरनिराळ्या ठिकाणच्या गौळवाड्यांनीं १९५९-६० सालांत चांगली प्रगति केली असल्याचें पुढील माहितीवरून दिसून येतें. १९५९ च्या नोव्हेंबर महिन्यापासून दिल्ली येथील गौळवाड्याच्या कामाला प्रारंभ झाला. ह्या गौळवाड्याच्या विकासासाठी ७७·२ लाख रुपयांची तरतूद करण्यांत आली होती. मद्रासजवळील माधवरम् येथील गौळवाड्याच्या कामालाहि १९५९ च्या नोव्हेंबर महिन्यांतच प्रारंभ झाला. ह्या दोन्ही गौळवाड्यांना अधिक प्रमाणांत दूध पुरविण्याच्या योजना आखण्यांत आल्या असून त्यांच्या अंमलबजावणीस प्रारंभ झाल्यावर त्यांना अधिक दुधाचा पुरवठा होऊं लागेल. कलकत्त्याजवळील गौळवाड्यांतील दुभत्या जनावरांच्या संख्येंत वाढ झालेली आहे. आतां ह्या दूधवाढींत दररोज १,३०० मण दुधाची व्यवस्था लावण्यांत येत असते. मुंबईजवळील आरे गौळवाड्यांत दररोज सुमारें ५,००० मण दुधाची व्यवस्था लावली जाते. १९५९-६० सालांत दुधाचा पुरवठा करणाऱ्या योजना पुढील शहरांतून अंमलांत आल्या. पुणें, गुंतुर, चंदीगड, गया, त्रिवेंद्रम्, भोपाळ, आगरताळा आणि कोइमतूर. त्याशिवाय इतरहि कांहीं शहरांना दूधपुरवठ्याच्या योजना चालू करण्यांत येणार आहेत. राजस्थान आणि अमृतसर ह्या ठिकाणीं दुधापासून टिकाऊ पदार्थ बनविण्याचे कारखाने काढण्यांत येत आहेत. त्याशिवाय बरौनी, जुनागड व अलिगड येथें तुपाचे कारखाने उभारण्यांत येत आहेत. दुधाच्या धंद्याबाबत न्यूझीलंडच्या सरकारकडून भारताला चांगली मदत मिळत आहे.

### मोटारींची निर्यात वाढविण्याचे जपानचे प्रयत्न

जपानमधील मोटारीच्या कारखानदारांनीं मोटारींची परदेशी निर्यात वाढविण्याचे प्रयत्न चालविले आहेत. परंतु सबंध तयार मोटारी निर्यात करण्यांत अडचणी येत असल्यामुळें संपूर्ण मोटारी सुट्या भागांच्या रूपांत निर्यात करण्याचें त्यांनीं ठरविलें आहे. अशा रीतीनें मोटारी निर्यात करणें अधिक सुलभ आहे. मोटारींचे संपूर्ण सुटे भाग बोटींतून परदेशीं धाडण्यांत येतील व त्या त्या देशांतील कारखानदार ते भाग जोडून मोटारी तयार करतील. ह्या पद्धतीनें मोटारी जुळविणाऱ्या कारखानदारांना त्या स्वस्त पडतात. सबंध मोटारी निर्यात करण्यासाठी जो वाहतुक खर्च सोसावा लागतो, त्यापेक्षा सुट्या भागांवर तो कमी असतो. शिवाय ह्या बाबतींत परदेशी व्यापाऱ्यांशीं करावयाच्या कराराच्या अटीहि जाचक नसतात. अशा पद्धतीनें मोटारी निर्यात करूं लागल्यापासून जपानी बनावटीच्या मोटारी अमेरिका, ऑस्ट्रेलिआ, सयाम, मलाया, भारत इत्यादि देशांतून निर्यात होऊं लागल्या आहेत. युरोपमध्येंहि जपानी मोटारींचा अशा रीतीनें शिरकाव होईल अशी जपानची अपेक्षा आहे. परदेशांच्या सरकारांना जपानकडून ह्या पद्धतीनें मोटारी घेणें पसंत पडतें. संपूर्ण सुट्या मोटारी आयात करून त्या स्थानिक यंत्रज्ञाकडून जोडून घेणें त्यांना अधिक सोईचें वाटतें. जपानी कारखानदार मोटारींच्या निर्यातीकडे आणखीहि एका दृष्टीनें पाहतात. मोटारी तयार करण्याच्या कामांत जपानचें तांत्रिक कसब जगापुढें येण्यास निर्यातीनें मदत होईल असें त्यांना वाटतें. परदेशीय कारखानदारांशीं अधिक संबंध आल्यामुळें जपानला तांत्रिक कसब शिकण्याची अधिक चांगली संधीहि मिळेल अशी त्यांची अपेक्षा आहे.

### अमेरिकेच्या एक्सपोर्ट-इंपोर्ट बँकेची मदत

तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या कालांत अमेरिकेच्या एक्सपोर्ट-इंपोर्ट बँकेकडून भारतामधील खाजगी मालकीच्या विभागाला चांगलें साह्य होण्याची शक्यता आहे. ह्याचा अर्थ सार्वजनिक मालकीच्या विभागाला मुळींच साह्य मिळणार नाहीं असा नाहीं. पण बँकेनें दिलेल्या पहिल्या मोठ्या १५ कोटी डॉलर्सच्या कर्जाचा जो विनियोग करण्यांत येत आहे त्यावरून खाजगी मालकीच्या विभागाला अधिक साह्य मिळेल असें दिसतें.

भारताच्या सरकारनें ११·८ कोटी डॉलर्सच्या योजनांना संमति दिलेली आहे. त्यापैकी ८·५ कोटी डॉलर्स, ज्या भारतीय खाजगी उद्योगधंद्यांना परदेशी चलनाची जरूर होती त्यांच्याकरतां मंजूर करण्यांत आले आहेत. ह्याउलट, सार्वजनिक मालकीच्या विभागांतील योजनांसाठी ३·३ कोटी डॉलर्सच मंजूर करण्यांत आले आहेत. ६·४ कोटी डॉलर्स किंमतीच्या यंत्रसामुग्रीच्या मागण्या नोंदविण्यांत आल्या आहेत. कर्जांचा विनियोग करण्याच्या ह्या प्रवृत्तीमुळें एक्सपोर्ट-इंपोर्ट बँकेच्या अधिकाऱ्यांना समाधान वाटत आहे असें समजतें. कारण, परदेशी भांडवल व अमेरिकन भांडवल ह्यांची जरूडण करून संयुक्त मालकीच्या औद्योगिक योजना अंमलांत आणणें हा बँकेचा एक प्रमुख हेतु आहे. ह्याच दिशेनें आणखी कांहीं आर्थिक घडामोडी लवकरच होण्याचा संभव आहे. हिंदुस्थान अल्युमिनम ह्या कंपनीला बँकेकडून १·२ कोटी डॉलर्स कर्ज देण्यांत आलेंच आहे. अशींच आणखी कांहीं कर्जें मिळण्याबद्दल वाटाघाटी चालू आहेत. बँकेकडून देण्यांत येणाऱ्या कर्जांमुळें अमेरिकन भांडवलाचें भारतामधील गुंतवणुकीचें प्रमाण वाढलें आहे. ब्रिटनच्या भारतामधील भांडवल गुंतवणुकीपेक्षा ते अधिक आहे.

## आर्थिक विकासाच्या कार्यांत बँकांचें स्थान

दिल्ली येथें अमेरिकेंतील बँकांची व्यवहाराची पद्धत व त्यांचीं पैसे गुंतवणुकीचीं धोरणें ह्या विषयावर एक परिसंवाद भरविण्यांत आला होता. हिंदमधील बँकिंगच्या धंद्यांतील प्रमुख, सरकारच्या अर्थखात्याचे अधिकारी, इत्यादि संबंधित लोक परिसंवादाला हजर होते. ह्या परिसंवादांत निरनिराळ्या १६ विषयांवर निबंध वाचण्यांत आले. रिझर्व्ह बँकेंतील एक अधिकारी श्री. मित्र ह्यांनीं पहिला निबंध वाचला. अमेरिकेंतील व्यापारी बँकांकडून मिळणारी मध्यम व दीर्घ मुदतीचीं कर्जें असा त्यांच्या निबंधाचा विषय होता. ते म्हणाले कीं, गेल्या कांहीं वर्षांत अमेरिकेंतील व्यापारी बँकांकडून एकूण जीं कर्जें धंदेवाइकांना देण्यांत येतात त्यांतील दीर्घ मुदतीच्या कर्जांचें प्रमाण बरेंच वाढलेलें आहे. दीर्घ मुदतीच्या कर्जांत झालेल्या ह्या झपाटीच्या वाढीला एक प्रमुख कारण आहे. अमेरिकेंतील धंद्यांच्या वाढत्या व्यापाला अल्प मुदतीचीं कर्जें अपुरीं पडूं लागलीं होतीं. कारण त्यांच्या गरजा वाढत चाललेल्या होत्या. अमेरिकेंतील उद्योगधंदे मोठ्या प्रमाणावर उत्पादन करण्याच्या नव्या पद्धति अंमलांत आणीत होते. त्याचबरोबर उत्पादन झालेल्या वस्तूंचा खपहि एकसारखा वाढत चालला होता. अमेरिकेचें औद्योगीकरण एकसारखे विस्तार पावत होते. त्यामुळें अल्प-मुदतीचीं परंपरागत पद्धतीचीं कर्जें अपुरीं पडूं लागलीं होतीं. बँक ऑफ इंडिआचे प्रतिनिधि श्री. करीमभाई ह्यांनीं व्यापारी बँकांनीं उद्योगधंद्यांना दीर्घ मुदतीचीं कर्जें देतांना सावधगिरी बाळगावी असा इशारा दिला. बँकेच्या हातीं असलेल्या पैशाच्या पुरवठ्यावर अशा कर्जांचा परिणाम होतो, असें ते म्हणाले.

## वजनाप्रमाणें उतारूंना आकार

आसाममध्यें कांहीं ठिकाणीं होणाऱ्या वैमानिक वहातुकींत उतारूंना स्वतःच्या वजनाप्रमाणें पैसे भरून तिकिटें घ्यावीं लागतात, असें इंडिअन एअरलाइन्स कॉर्पोरेशनच्या जनरल मॅनेजरनें एका भाषणांत नुकतेंच सांगितलें.

## १९७५ च्या रशिआचें आकर्षक चित्र

रशिआनें केलेल्या तांत्रिक व शास्त्रीय प्रगतीबद्दल आतां अमेरिकेसुद्धां शंका राहिलेली नाहीं. तथापि ही प्रगति विज्ञानाचा उपयोग विध्वंसक कामासाठी करण्याच्या दिशेनें झालेली आहे असें म्हणतां येईल. रशिआंतील लोकांची आर्थिक परिस्थिति सुधारण्याच्या कामीं विज्ञानाचा उपयोग कितपत करण्यांत येत आहे असा प्रश्न विचारण्यांत येत असतो. रशिआंतील एक अर्थशास्त्रज्ञ मि. स्ट्रुमलिन ह्यांनीं रशिआंतील आर्थिक प्रगतीविषयीं आपले विचार एका लेखांत प्रकट केले आहेत. ते म्हणतात कीं रशिआनें आपल्या आर्थिक विकासाचा सध्याचाच वेग चालू ठेवला तर १९६५ सालीं रशिआंत कोठल्याच प्रकारचे कर बसविण्याची जरूर भासणार नाहीं. १९७५ च्या सुमारास तर सर्व कामगारांना मोफत जेवण देण्यांत येईल. रशिआचा सध्याचा सप्तवार्षिक कार्यक्रम १९६५ सालीं पूर्ण होतो. त्या सुमाराला रशिआंतील नागरिकांना कोणत्याहि प्रकारचे कर द्यावे लागणार नाहींत. कारण, साधनसामग्रीची वाढ खूप मोठ्या प्रमाणावर झालेली असेल. रशिआंतील मुला-मुलींच्या शिक्षणासाठीच फक्त खर्च करावा लागेल. त्यांच्या जेवणाखाणाची व्यवस्था शाळांतून मोफत करण्यांत येईल. १९८० च्या सुमाराला सर्व कामगारांना वस्त्रें आणि पायतणें मोफत पुरविण्यांत येऊं लागतील. त्याचप्रमाणें येत्या १२ वर्षांच्या कालांत प्रत्येक रशिअन कुटुंबाला आपल्या मालकीची राहण्याची जागा देण्यांत येईल. रशिआंतील कामगाराला अवघे चार तास काम करावें लागेल, त्यामुळें त्याला आपली सांस्कृतिक उन्नति करून घेण्यास भरपूर वेळ मिळेल. माणसाचें सुप्त सामर्थ्य जागृत होण्यास फावल्या वेळाची फार आवश्यकता असते.

## दोन आण्यांचीं व अर्ध्या आण्याचीं पांढरीं नाणीं

आणे व पै चीं जुनीं नाणीं काढून घेण्यासंबंधीच्या भारत सरकारच्या योजनेंतील तिसऱ्या टप्प्यानुसार, १ ऑक्टोबर १९६० पासून दोन आण्यांचीं व अर्ध्या आण्यांचीं पांढऱ्या रंगाचीं नाणीं कायदेशीर चलन म्हणून राहणार नाहींत. तथापि जनतेकडून, देणें देण्याकरतां किंवा बदलून देण्याकरितां आलेलीं नाणीं ३१ मार्च १९६१ पर्यंत स्वीकारण्यांत येतील. रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या सर्व कचेऱ्या, या बँकेचे एजंट म्हणून काम करणाऱ्या सर्व बँका, सर्व सरकारी ट्रेझरीज व सब ट्रेझरीज येथें हीं नाणीं स्वीकारण्यांत येतील. वरील तारखेपर्यंत रेल्वे-कचेऱ्या, पोस्ट व टेलिग्राफ वगैरे ठिकाणींहि रेल्वेचीं तिकिटें काढतेवेळीं, माल पाठवितांना, पोस्टाचीं तिकिटें खरेदी करतांना अगर रेडिओ लायसेन्सची फी देतेवेळीं हीं नाणीं स्वीकारण्यांत येतील.

त्याचप्रमाणें यासंबंधीं आणखी सूचना मिळेपर्यंत, रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या मुंबई, कलकत्ता, मद्रास, कानपूर, नवी दिल्ली, बंगलोर आणि नागपूर येथील इश्यू डिपार्टमेंटमध्यें वरील नाणीं ३१ मार्च १९६१ नंतरहि स्वीकारण्यांत येतील.

पांढऱ्या रंगाचीं एक आण्याचीं व पैशाचीं नाणीं मात्र सध्याप्रमाणेंच कायदेशीर राहतील. त्याचप्रमाणें एक रुपया, अर्धेली व पावलीचीं नाणींहि कायदेशीर राहतील. तीं व्यवहारांतून काढून घेतलीं जाणार नाहींत.

## नव्या कंपन्यांच्या नोंदींत वाढ

### कंपनी कायद्याच्या कामकाजाचा तिसरा वार्षिक अहवाल

एप्रिल १९५६ ते मार्च १९५९ या तीन वर्षांत नव्या कंपन्यांच्या नोंदणींत हळूहळू वाढ होत गेली. १९५६–५७ मधील अशा कंपन्यांची संख्या ८४८ वरून १९५७–५८ मध्यें ९६१ तर १९५८–५९ मध्यें १,०९५ वर जाऊन संदर तीन वर्षांत एकूण २,९०४ नव्या कंपन्या निघाल्या. त्यांपैकी २०७ पब्लिक आणि २,६९७ प्रायव्हेट कंपन्या होत्या. विशेषतः मुंबई, प. बंगाल, मद्रास आणि दिल्ली या प्रमुख राज्यांत त्यांपैकी २,२९८ कंपन्या स्थापन झाल्या. त्यांपैकी मुंबईराज्यांत या मुदतींत २० टक्के कंपन्या निघाल्या. या २,९०४ कंपन्यांपैकी १,२५९ कंपन्या औद्योगिक व उत्पादक स्वरूपाच्या होत्या तर ८७५ कंपन्या व्यापार–उदीम आणि कर्जपुरवठा करणाऱ्या होत्या.

मध्यवर्ती व्यापारखात्याचे मंत्री श्री. नित्यानंद कानुंगो यांनीं लोकसभेंत १९५६ च्या कंपनी कायद्याची अंमलबजावणी आणि कारभार यासंबंधीं सादर केलेल्या (१९५८–५९ च्या) तिसऱ्या वार्षिक अहवालांत ही माहिती दिलेली आहे. तसेंच त्यांत मार्च १९५९ ला संपलेल्या तीन वर्षांतील कंपनी कायद्याच्या कारभाराचें सविस्तर पुनर्विलोकन करण्यांत आलेलें आहे. १९५८–५९ साल म्हणजे नव्या कायद्याचें पालन कंपन्यांकडून तसेंच कारभार यंत्रणेकडून कशा प्रकारें चाललें आहे तें अजमाविण्याचें व पाहणी करण्याचें गेलें असेंहि त्यांत म्हटलेलें आहे. १९५६ चा कंपनी कायदा संमत झाल्यानें आणि डिपार्टमेण्ट ऑफ कंपनी लॉ ॲडमिनिस्ट्रेशनच्या कार्यामुळें जॉइंट स्टॉक कंपन्यांच्या व्यवहारासंबंधींची तपशीलवार माहिती, आतांपर्यंत केवळ त्यांचे मालक व त्यांच्या गोटांतील लोक यांच्यापुरतीच मर्यादित न राहतां या कंपन्यांच्या कामकाजाची माहिती मिळवूं इच्छिणाऱ्या कोणासहि करून घेणें शक्य झालें आहे. यामुळें सरकारलाहि कंपनी क्षेत्रांत व्यवस्था राखण्याचें कामहि चांगल्या प्रकारें करतां येईल. आतांपर्यंत कारभारयंत्रणा कंपन्यांच्या बाबतींत कडकपणा दाखवीत नसे, पण गेल्या दोन वर्षांत या कायद्यांतील तरतुदींसंबंधीं अधिक माहिती झाली असल्यानें त्यांतील तरतुदी अधिक कडकपणें अंमलांत आणण्यास योग्य वेळ आली आहे असेंहि या अहवालांत म्हटलें आहे.

नव्या कंपन्यांच्या आकारमानाबद्दल या अहवालांत म्हटलें आहे कीं सुमारें ६० टक्के कंपन्या लहान म्हणजे ५ लक्ष रुपयांहून कमी भांडवलाच्या आहेत. १ कोटी रु. वा त्याहून जास्त भांडवल असलेल्या कंपन्या ७८ आहेत. १९५८–५९ अखेरीस ७,७६० पब्लिक आणि १९,७१९ प्रायव्हेट मिळून २७,४७९ कंपन्या चालू असाव्यात असा अंदाजहि त्यांत व्यक्त केलेला आहे. या कंपन्यांचें मिळून वसूल भांडवल अंदाजें १,५१० कोटी रु. असावें. ज्या कंपन्यांचें काम चालू नाहीं त्यांचीं नांवें चालू रजिस्टरांतून काढून टाकण्याचें काम १९६० मध्यें पुरें होईल. मार्च १९५९ ला संपलेल्या तीन वर्षांत कंपन्यांच्या वसूल भांडवलांत हळूहळू वाढ होत जाऊन ते ४८६ कोटी रुपयांनीं वाढलें. त्यांतील सरकारी आणि बिन-सरकारी कंपन्यांचा वांटा अनुक्रमें ३५८ कोटी रुपये व १२८ कोटी रुपये आहे. सरकारी कंपन्यांत एकट्या हिंदुस्थान स्टील लि. चा आंकडा ३०० कोटी रुपयांचा आहे. १९५८–५९ अखेरीस एकूण १०३ सरकारी कंपन्या चालू होत्या व त्यांचें वसूल भांडवल ४२४ कोटी रुपये होतें. या तीन वर्षांत ४७ नव्या सरकारी कंपन्या निघाल्या.

कंपनी कायदा अंमलांत आल्यापासून ३३८ पब्लिक कंपन्यांनीं आपल्या कंपन्यांचें प्रायव्हेट कंपन्यामध्यें रूपांतर केलें. यांपैकी पहिल्या वर्षांत २२७ व १९५७–५८ व १९५८–५९ मध्यें अनुक्रमें ५४ व ५७ पब्लिक कंपन्या प्रायव्हेट कंपन्या झाल्या. ह्यावरून पब्लिक कंपन्या प्रायव्हेट कंपन्या करण्याकडे कल झुकेल अशी जी भीति व्यक्त करण्यांत आली होती ती या आंकडेवारीवरून कमी झाल्याचें दिसून येईल. कंपन्यांचे संचालक किंवा त्यांचे नातेवाइक, यांना तसेंच, संचालकांचा ज्या फर्म्समध्यें किंवा प्रायव्हेट कंपन्यांमध्यें हितसंबंध गुंतलेला असेल त्यांना कर्जें देण्यासाठी पब्लिक कंपन्यांना आणि पोट कंपन्यांना सरकारी परवानगी घ्यावी लागते. त्याचप्रमाणें कर्जें देणाऱ्या कंपनीच्या संचालकांच्या नियंत्रणाखालीं असलेल्या पब्लिक कंपन्यांना कर्जें देण्यासाठींहि मध्यवर्ती सरकारची परवानगी लागते. गेल्या तीन वर्षांत अशी परवानगी मिळविण्यासाठी एकूण ११·५७ कोटी रुपये कर्जासाठी भारत सरकारकडे १५१ अर्ज आले. त्यांपैकीं एकूण ७·१३ कोटी रुपये कर्जाचे ७० अर्ज संमत करण्यांत आले. कंपन्या-कंपन्यांमध्यें भांडवल गुंतविण्यासाठी आलेल्या अर्जांपैकीं ९० टक्के अर्जांना मान्यता देण्यांत आली. कर्ज आणि गुंतवणूक यासंबंधीं आलेल्या अर्जांचा विचार करतांना अगदीं तपशीलवार व छाननी करून विचार करण्यांत आला आहे असें अहवालांत म्हटलें आहे.

कंपन्यांचा कारभार आणि मालकी याबाबतच्या चौकशीचा उल्लेख करून अहवालांत म्हटलें आहे कीं, गेल्या तीन वर्षांत कंपनी कायद्याच्या २३५ व २३७ कलमान्वयें इन्स्पेक्टर नेमण्यासाठी ८४ प्रकरणें आलीं होतीं. परंतु प्राथमिक चौकशी केल्यानंतर यांपैकी ६५ प्रकरणीं अशी जरूरी असल्याचें दिसून आलें नाहीं व म्हणून १४ प्रकरणीं अशी तपासणी करण्याचा हुकूम देण्यांत आला. १९५८–५९ च्या अखेरीस ५ प्रकरणांवर विचार चालू होता.

या कायद्याचें यथायोग्य प्रकारें पालन करण्यासाठी प्रॉसिक्युशन डिव्हिजन अधिक बळकट करण्यांत आल्याचें ह्या अहवालांत म्हटलें आहे. त्यासाठी करण्यांत आलेल्या विविध उपाययोजनांचा उल्लेख करून अहवालांत म्हटलें आहे कीं, कंपन्या आणि त्यांचे अधिकारी यांच्यावर १९५८–५९ मध्यें २,४९५ खटले भरण्यांत आले. त्यामागील वर्षांतील बाकी राहिलेल्या ७३८ प्रकरणांसुद्धां ह्या विभागानें ५,११० खटले हाताळले. यांपैकी ३,४७४ प्रकरणें कोर्टानें हाताळलीं व त्यामध्यें २,१२१ प्रकरणीं गुन्हे शाबीत झाले. कंपनी कायद्याचा भंग केल्याबद्दल गेल्या तीन वर्षांत संबंधितांना कोर्टानें एकूण १·८२ लक्ष रुपये दंड केला.

कंपनी कायद्यानें मध्यवर्ती सरकारला असलेल्या सत्तेचें विकेन्द्रीकरण करण्याच्या बाबतींत झालेली प्रगति व ह्या विभागानें इतर बिनसरकारी संघटना व संस्था यांच्याशीं ठेवलेला घनिष्ठ संबंध याचाहि अहवालांत परामर्श घेण्यांत आला आहे.

तक्रारींचें निराकरण व चौकशी करण्यासाठी उभारण्यांत आलेली यंत्रणा व पद्धति यांचा उल्लेख करून, शेअरहोल्डर्सची संघटना असण्याच्या आवश्यकतेवर अहवालांत भर देण्यांत आला आहे.

## मानसिक रोग्यांसाठी अधिक सोयी

मुंबई राज्याचे आरोग्यमंत्री श्री. कन्नमवार ह्यांनीं राज्याच्या विधान सभेंत अशी माहिती सांगितली कीं ठाणा, येरवडा आणि अहमदाबाद येथील वेड्यांच्या इस्पितळांत प्रवेश मिळवूं इच्छिणाऱ्या रोग्यांची संख्या फार वाढली आहे. आरोग्य मंत्र्यांनीं ह्याबाबत जीं कारणें सांगितली आहेत तींहि उद्बोधक आहेत. पहिलें कारण असें कीं राहणीचा खर्च फार वाढल्यामुळें ज्या मध्यमवर्गीय कुटुंबांतून असे मानसिक रोगी उत्पन्न होतात त्या कुटुंबांना रोग्यांना घरींच ठेवून घेणें अशक्य होत चाललेलें आहे. मध्यम वर्गाप्रमाणेंच त्याहि खालीं असणाऱ्या वर्गाच्या लोकांची स्थिति आहे. मानसिक रोग्यांना विजेचे धक्के देऊन बरें करण्याची एक उपचारपद्धति आहे. तीहि लोकांना अधिक पसंत होऊं लागली आहे. ही उपचारपद्धति इस्पितळांतच शक्य असल्यानें मानसिक रोग्यांना इस्पितळांत ठेवण्याची प्रवृत्ति वाढत चालली आहे. आरोग्यमंत्र्यांच्या मतानें तिसरें कारण म्हणजे आधुनिक जीवनांत मनावर पडणारा असह्य ताण. ह्या कारणामुळें किती प्रमाणांत मानसिक रोगी निर्माण होतात हें कळण्यास मार्ग नाहीं. पण असह्य ताणांत आर्थिक कारणामुळें उत्पन्न होणारी मनाची नाजूक अवस्था अभिप्रेत असलीच पाहिजे. अर्थशास्त्र व मानसशास्त्र हीं दोन शास्त्रें अगदींच भिन्न असली व वाटली तरी शास्त्रांचा उगमहि अखेर मनांतूनच होतो. तेव्हां त्यांचे प्रांत बाह्यतः जरी भिन्न वाटले तरी त्या प्रांतांतील घडामोडींचा मनावर परिणाम घडून येणें स्वाभाविक आहे. आरोग्यमंत्र्यांनीं मानसिक रोग्यांवर उपचार करण्यासाठी निरनिराळ्या इस्पितळांतुन अधिक सोयी करण्यांत येत असल्याचें सांगितलें. पण रोगाचें मूळ विसरून चालणार नाहीं.

---

## सन १९५९ मधील नव्या कंपन्या

गेल्या तीन वर्षांपेक्षा १९५९ मध्यें सर्वांत अधिक म्हणजे १,३९९ नव्या कंपन्यांची–७५ पब्लिक व १,३२४ प्रायव्हेट–नोंद झाली. मुंबई आणि मध्यप्रदेश मिळून बनलेल्या प. विभागांतहि याबाबतींत वाढ झाली असून मुंबई राज्यांत २९० नव्या कंपन्यांची नोंद झाली. सन १९५९ मध्यें नोंदणी झालेल्या कंपन्यांत १९ सरकारी कंपन्या होत्या.

---

## बँक ऑफ कराडची विटें शाखा

दि बँक ऑफ कराड लि. ची विटें (द. सातारा) शाखा सोमवार, दि. २८ मार्च रोजीं चैत्र पाडव्याचे सुमुहूर्तावर उद्योगरत्न श्री. वि. रा. वेलणकर ह्यांच्या हस्तें उघडण्यांत आली.

---

## लिटरनें मापून पेट्रोल

पेट्रोल आतां लिटरनें मापून देण्यास प्रारंभ झाला आहे. ५ लिटर = १.१० गॅलन, असें प्रमाण पडतें.

---

## साखरेची आयात केली जाणार नाहीं

कितीहि तुटवडा पडला, तरी साखर आयात केली जाणार नाहीं- असें अन्नमंत्रि श्री. स. का. पाटील ह्यांनीं जाहीर केलें आहे. पुरेशा साखरेवांचून भागूं शकेल; ती कांहीं जीवनावश्यक बाब नाहीं, असें ते म्हणाले.


स्थापना १९३६

दि युनायटेड वेस्टर्न बँक लि. सातारा

[ शेड्यूल्ड बँक ]

हेड ऑफिस :

पॅलेस स्ट्रीट, चिरमुले निकेतन, सातारा शहर.

शाखा–१. मुंबई, फोर्ट, २. मुंबई, गिरगांव, ३ मुंबई, दादर, ४. नासिक, ५. पुणें, ६. बार्शी, ७. लोणंद, ८. कोल्हापूर, ९. हलकर्णी, १०. इचलकरंजी, ११. फलटण, १२. अकलूज.

| | | ३१ डिसेंबर, १९५९ |
|---|---|---|
| वसूल भांडवल | रु. | ६,५०,००० |
| रिझर्व्ह व इतर फंडस् | रु. | ४,७१,००० |
| ठेवी | रु. | १,८८,५१,०१० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | २,१७,२५,००० |

मुदत ठेवींवरील व्याज :

| १ वर्ष ते २ वर्षें | तीन वर्षें | ५ वर्षें | दहा वर्षें |
|---|---|---|---|
| रु. ३.०० | रु. ३.२५ | रु. ३.५० | रु. ४.०० |

रु. एक हजार अगर त्याहून अधिक रकमा अल्प मुदतीनें आकर्षक व्याजाचे दरानें स्वीकारल्या जातात.

दराबाबत चौकशी करावी.

| | | |
|---|---|---|
| सेव्हिंग्ज बँक | दरसाल दर शेंकडा | २.०० |
| सेव्हिंग्ज डिपॉझिट | दरसाल दर शेंकडा | २.५० |
| चालू डिपॉझिट | दरसाल दर शेंकडा | ०.५० |

*सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.*

सी. ह. जोशी, बी. ए., बी. कॉम्., जन. मॅनेजर. — शं. ह. साठे, बी. ए., एलएल. बी., चेअरमन



# भोर स्टेट बँक लि.

( स्थापना १९४४ )

मुख्य कचेरी :—भोर, जि. पुणें.

शाखा :—पुणें, पाली व शिरवळ

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | ... | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल | ... | रु. २,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | ... | रु. ९१,००० |

*मुख्य कचेरींत भाड्यानें डिपॉझिट लॉकर्सची सोय केली आहे.*

सरकारी रोखे खरेदी-विक्री, व्याज वसुली, पेन्शन कलेक्शन व बँकिंगचे इतर सर्व व्यवहार केले जातात. बँक १ ते ४ वर्षें मुदतीसाठी कायम ठेवी स्वीकारते.

दराबाबत समक्ष चौकशी करावी.

पुणें कचेरी :— बुधवार घ. नं. ३६१–६२ पासोड्या विठोबा नजिक. फोन नं. २५७६.

—अधिक माहितीसाठी लिहा—

(—बोर्ड ऑफ डायरेक्टर्स—)

| | |
|---|---|
| श्री. म. त्र्यं. शिंगरे, अध्यक्ष | न. भू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष |
| रावसाहेब य. द. खोले | श्री. चं. रा. राठी |
| श्री. गो. बा. देवी | श्री. बा. ग. धंदुके |

## अमेरिकेंतील शेतीचें स्वरूपच वेगळें

### उत्पादनक्षमतेचें रहस्य

आतां प्रत्येक अमेरिकन शेतकरी २४ लोकांना पुरेल इतक्या अन्नपदार्थांचें उत्पादन करतो, पण तीन पिढ्यांपूर्वी अमेरिकेंतील शेतकऱ्याला स्वतःच्या कुटुंबाला पुरेसें अन्न मिळविण्यासाठी पहाटेपासून रात्रीपर्यंत काम करावें लागत असे. अमेरिकेंत ग्रामीण विभागांतून शहरी विभागांकडे लोकवस्तीचें स्थलांतर सतत होत आहे, परंतु शेतीचें उत्पादन घटण्याऐवजीं वाढलें आहे आणि शेती समृद्ध झाली आहे. आतां गवताचें पीक पूर्वीच्या दसपट मिळत आहे, कोंबड्यांचें व अंड्यांचें उत्पादन वाढलें आहे, दुभत्या गाई आतां पूर्वीच्या दुप्पट दूध देत आहेत, फळबागांत अधिक मोठ्या व अधिक रसाळ फळांचें भरघोस पीक येत आहे, अविश्वसनीय वाटण्याइतक्या मोठ्या आकाराचे बटाटे मिळूं लागले आहेत.

अमेरिकन शेतीची उच्च उत्पादनक्षमता निसर्गाच्या अनुकूलतेवर फारशी अवलंबून नसते. नेटाचे व्यक्तिगत प्रयत्न, उद्योगशास्त्रीय शोधांचा उपयोग, यांत्रिक शेती व भांडवलाची गुंतवणूक हीं सर्व वैशिष्ट्यें कौटुंबिक शेतींत दिसून येतात, आणि कौटुंबिक शेतावरील दर माणशीं उत्पादनाच्या प्रचंड प्रमाणावर अमेरिकन शेतीची उच्च उत्पादनक्षमता अवलंबून आहे.

अमेरिकेंतील सर्वसाधारण कौटुंबिक शेतवाडीवरील परिस्थिति सामान्यतः अशी असते. शेतकऱ्याची जमीन सुमारें ३१० एकरांची असते, आणि तींपैकीं सुमारें ४० टक्के जमिनींत तो पिकें काढतो. जमीन व इमारती यांसाठी सुमारें २५,००० डॉलर, यंत्रसामुग्रीसाठी सुमारें ४,००० डॉलर आणि पाळीव पशुपक्ष्यांसाठी सुमारें ३,२०० डॉलर असें भांडवल त्यानें गुंतविलेलें असतें. (१ डॉलर म्हणजे सुमारें ४ रुपये ७१ नवे पैसे). यंत्रसामुग्री भाड्यानें घेण्यासाठी किंवा मजूर ठेवण्यासाठी किंवा दोन्हींसाठी तो सुमारें १,००० डॉलर खर्च करतो, आणि शेतवाडीवरील उत्पादित मालाची विक्री करून त्याला सुमारें ७,४०० डॉलर मिळतात.

या सर्वसाधारण कौटुंबिक शेतवाडीवर विजेची व नळाच्या पाण्याची सोय असते. (अमेरिकेंतील ९० टक्क्यांपेक्षा अधिक शेतवाड्यांवर विजेचा उपयोग केला जातो). या सोयींमुळें शेतीचीं कामें अधिक कार्यक्षमतेनें करतां येतातच, पण त्याशिवाय घराची व्यवस्था अधिक चांगली ठेवतां येते, आणि त्यामुळें कुटुंबांतील माणसांचें आरोग्य चांगलें राहतें, त्यांचें पोषण चांगलें होतें व त्यांना रिकामा वेळ अधिक मिळतो.

शेतकऱ्याला नियतकालिकांतून व दैनिक वृत्तपत्रांतून मिळणाऱ्या माहितीच्या जोडीला टेलीफोन व रेडियो या साधनांवरूनहि माहिती मिळत असते. जर शेतवाडी दूरचित्रवाणीच्या (टेलीव्हिजन) केंद्राच्या कक्षेंत असेल तर शेतकऱ्याच्या घरीं दूरचित्रवाणीचा संचहि असण्याचा संभव असतो.

१९५० सालीं ३ टक्क्यांपेक्षा कमी शेतकऱ्यांजवळ दूरचित्रवाणीचे संच होते. पण १९५७ सालीं ६० टक्क्यांपेक्षा अधिक शेतकऱ्यांनीं हे संच विकत घेतले होते. दळणवळण व वाहतूक यांत सुधारणा झाली असल्यामुळें, शेतकऱ्याला बाजारांतील घडामोडींशीं पूर्वीपेक्षा अधिक शीघ्रतेनें संबंध ठेवतां येतो, आणि त्याच्या कुटुंबांतील माणसांना शैक्षणिक, सांस्कृतिक व सामाजिक क्षेत्रांतील संधींचा लाभ पूर्वीपेक्षा अधिक प्रमाणांत घेतां येतो.

**मंत्र्यांना मोफत विमा**—मद्रास राज्याच्या मंत्र्यांना ते विमानानें प्रवास करतील त्यावेळीं १ लाख रुपयांचा अपघाताचा विमा ह्यापुढें सरकारी खर्चानें मिळणार आहे. मंत्र्यांना धावत्याच्या भत्त्याबद्दलच्या नियमांत बदल करण्यांत आला असून विमानांतील प्रवासाच्या वेळीं त्यांना अपघातावद्दल उतरलेल्या विम्याचे पैसे त्यांना सरकारकडून मिळणार आहेत.

**संपामुळें झालेलें नुकसान**—आरे गोळवाड्यांतील कामगारांनीं नुकतांच जो संप केला होता त्यामुळें झालेल्या नुकसानीची माहिती अशी आहे. संपाच्या काळांत १,३०० मण शुद्ध दूध व ६० मण दुधाची भुकटी मिसळून तयार केलेलें दूध गटारांत ओतून घावें लागलें. कांहीं दूध नासल्यामुळें व कांहींत संपवाल्यांनीं फोडलेल्या कांचेच्या बाटल्यांचे तुकडे गेल्यामुळें त्याचा नाश करावा लागला.

**कलिंग बक्षिसाचा मानकरी**—१९५९ सालचें कलिंग पारितोषक जीन रोस्टॅ नांवाच्या एका फ्रेंच जीवशास्त्रज्ञाला देण्यांत आल्याचें संयुक्त-राष्ट्र-संघटनेच्या सांस्कृतिक उपसंघटनेनें जाहीर केलें आहे. हें पारितोषक ओरिसांतील एका उद्योगपतीनें ठेवलेलें असून तें १,००० पौंडांचें आहे.

**रेडारमुळें सार्वजनिक आरोग्यास धोका**—शत्रूच्या विमानांची आगाऊ खबर देण्यासाठी ब्रिटननें रेडारचें जें जाळें निर्माण केलें आहे त्यामुळें सार्वजनिक आरोग्याचा धोका पोंचण्याची भीति आहे असें मत व्यक्त करण्यांत आलें आहे. हैड्रोजन बॉबच्या स्फोटामुळें किरणोत्सारी धूलीकण निर्माण होतात. त्यांच्यामुळें मनुष्याच्या भावी पिढ्यांना धोका पोंचतो. तसाच धोका रेडारमुळें होण्याचा संभव आहे.

**कच्च्या फिल्मचा कारखाना**—उटकमंड येथें एका फ्रेंच कंपनीच्या साह्यानें काढण्यांत यावयाच्या कच्च्या फिल्मच्या कारखान्याचें प्राथमिक स्वरूपाचें काम लवकरच सुरू करण्यांत येणार आहे. कारखान्यासाठी ५ कोटी रु. भांडवल लागणार आहे. नौकरवर्गाची भरती लवकरच होऊं लागेल. प्रत्यक्ष उत्पादनास प्रारंभ १९६२ च्या मध्यास होईल.

**प्रवासी वहातुकींत वाढ**—भारतामधील अंतर्गत विमान वहातुकीसाठी जेटवर चालणारीं विमानें वापरण्यांत येऊं लागलीं तर प्रवासी वहातुकींत ३०० टक्के वाढ होईल असा अंदाज इंडिअन एअरलाइन्स कॉर्पोरेशनचे जनरल मॅनेजर श्री. लाल ह्यांनीं केला आहे. त्या दृष्टीनें कॉर्पोरेशनच्या हालचाली चालू आहेत.

**विजेच्या उत्पादनाचें उद्दिष्ट**—दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या अखेरीस जेवढी वीज उत्पन्न करण्याचें ओरिसा राज्यसरकारनें ठरविलें होतें तितकी वीज उत्पन्न करतां येणें शक्य होणार नाहीं. हिराकूड वीजनिर्मितीच्या केंद्रांत सध्यां ७१,००० किलोवॅट वीज निर्माण होते. ८३,००० किलोवॅट वीज निर्माण करण्याचें ठरविण्यांत आलें होतें. तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या पहिल्या वर्षांत उद्दिष्ट गांठलें जाण्याची शक्यता आहे.

**विधान सभेंतील सोय**—नव्यानें स्थापन करण्यांत यावयाच्या महाराष्ट्र राज्याच्या विधान सभेंत ध्वनिक्षेपणाची नवी व्यवस्था करण्यांत येणार आहे. सध्यां अशा प्रकारची व्यवस्था लोकसभेंत व म्हैसूर विधान सभेंत आहे. प्रत्येक बाकापुढें स्वतंत्र ध्वनिक्षेपक बसविण्यांत येईल. ह्या कामासाठी १,२५,००० रुपये खर्च येणार आहे.

## डेक्कन इन्स्टिटयूट ऑफ कॉमर्स

### एक्स्टर्नल बी. कॉम्. च्या वर्गासाठी इमारतवाढ देणग्यांची आवश्यकता

डेक्कन इन्स्टिटयूट ऑफ कॉमर्स ही संस्था पुणें शहरांत सार्वजनिक दृष्टया व्यापारी शिक्षणप्रसाराचें उपयुक्त कार्य गेलीं ४१ वर्षे करीत आहे. संस्था निरनिराळ्या व्यापारी व सहकारी डिप्लोमा परीक्षांकरितां विद्यार्थी तयार करते. अभ्यासक्रम १ ते २ वर्षांचा असतो. एस्. एस्. सी. अगर मॅट्रिक नंतर प्रवेश मिळतो. गव्हर्मेंट कमर्शिअल डिप्लोमा व सर्टिफिकेट परीक्षांस विद्यार्थी बसविण्याबाबत संस्थेला सरकारी मान्यता असून या परीक्षेस दरवर्षी विद्यार्थी पाठविले जातात. संस्थेंतून अनेक नामांकित विद्यार्थी तयार झाले असून त्यांनीं व्यापारोद्योगिक क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी केली आहे.

देशाच्या औद्योगिक व व्यापारी प्रगतीस आवश्यक असलेला आर्थिक दृष्टिकोन समाजांत या शिक्षणक्रमांतून जें ज्ञान प्रसृत होतें त्यामुळें निर्माण होतो. मॅट्रिक अगर एस्. एस्. सी. पर्यंतच्या शिक्षणक्रमांत भासत असलेली व्यावहारिक ज्ञानाची उणीव या शिक्षणानें अल्प खर्चांत व थोड्या वेळांत भरून निघते.

संस्थेच्या सिल्व्हर ज्युबिलीच्या निमित्तानें १९४७ मध्यें संस्था हल्लीं ज्या जागेंत आहे ती जागा संस्थेनें खरेदी घेतली. सदर इमारत घेण्यानें संस्थेचें कार्यहि वाढलें व नावलौकिकहि वाढला.

### बी. कॉम्. एक्स्टर्नलची सोय

इन्स्टिटयूटच्या चालकांनीं बी. कॉम्. डिग्री परीक्षा एक्स्टर्नल व्हावी म्हणून बरींच वर्षें खटपट चालविली होती. त्यास १९५८ मध्यें यश येऊन पुणें विद्यापीठाच्या पुरोगामी धोरणामुळें आतां व्यापारी अभ्यासक्रमाच्या पदवी (बी. कॉम्.) परीक्षेस बाहेरून (कॉलेजांत न जातां) बसतां येण्याची सोय उपलब्ध झाली आहे. पुणें विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रांत राहाणाऱ्या व नोकरीव्यवसायांत असणाऱ्या स्त्री-पुरुषांना आतां या संधीचा फायदा घेणें शक्य झालें आहे.

या नवीन प्रगतीपर व प्रोत्साहनपर संधीचा उपयोग करण्याच्या दृष्टीनें संस्थेनें जून १९५८ पासून बी. कॉम्. पदवी परीक्षेच्या अभ्यासाची तरतूद करण्याचें ठरवलें. सकाळ-संध्याकाळ सोईस्कर वेळीं वर्ग भरले जाण्याची तरतूद, तुलनात्मक दृष्टया माफक शिक्षणखर्च, व्यापारी शिक्षणांतील पदवी मिळविण्याची शक्यता, यामुळें पहिल्याच वर्षी संस्थेनें नव्यानें सुरू केलेल्या प्रि-डिग्री कॉमर्स कोर्सच्या वर्गात ६० विद्यार्थी दाखल झाले. पैकी ४५ अखेरपर्यंत राहून परीक्षेस बसले आहेत.

येत्या जूनपासून यापुढचे वर्ग सुरू होणार असल्यानें जागेची टंचाई तीव्रतेनें भासूं लागली आहे. हल्लींच्या इमारतीची वाढ करणें आवश्यक झालें आहे. त्या दृष्टीनें प्लॅन-एस्टिमेट केलें असून जरूर ती परवानगी मागितली आहे. अंदाजें रु. ३५,००० चें एस्टिमेट आहे.

मात्र या कामीं आवश्यक तेवढें द्रव्यबळ नाहीं. तेव्हां संस्थेच्या गेल्या ४० वर्षांतील सातत्यानें व चिकाटीनें चालू असलेल्या प्रगतीपर कार्याची दखल घेऊन कार्याशीं सहानुभूति बाळगणारे, माजी विद्यार्थी, विद्यार्थ्यांचे पालक, या सर्वांनीं शक्य होणारी देणगी देऊन योजलेली इमारत सत्वर पूर्ण करण्यास समर्थ करावें, अशी संस्थेच्या चालकांची विनंती आहे.

## सहकारी संस्थांचा १९६०-६१ मधील विकास

### ११·३७ कोटी रु. ची योजना

राष्ट्रीय सहकारी संस्था आणि गुदाम मंडळानें सहकारी संस्थांच्या १९६०-६१ मधील विकासासाठी ११·३७ कोटी रु. ची योजना तयार केली असून त्याद्वारें सहकारी सोसायट्यांच्या विकासासाठी राज्य सरकारांना केंद्रीय साह्य मिळेल. पतपेढ्या, बाजारपेठ, प्रक्रिया आणि सांठवण यांसारख्या सहकारी चळवळीच्या विविधांगांचा ह्या योजनेंत अंतर्भाव करण्यांत आला आहे.

नव्या सहकारी सेवा संस्था स्थापन करून किंवा चालू सहकारी संस्थांचा विकास करून या वर्षी सुमारें २८,४४० सहकारी सेवा संस्था सुरू होतील असा अंदाज आहे.

बाजारपेठविषयक क्षेत्रांचा विचार करतां, दुसऱ्या योजनेच्या चवथ्या वर्षाच्या अखेरीस सुमारें १,५७४ सहकारी संस्था कार्य करूं लागतील. प्रचलित संस्थांची पुनर्रचना वा नव्यानें स्थापना करून आणखी २५७ सहकारी संस्थांची तरतूद या योजनेंत असल्यानें १९६०-६१ च्या अखेरीस त्यांची संख्या १,८३१ वर जातील.

सन १९५९-६० पर्यंत सहकारी साखर कारखान्यांखेरीज इतर २३२ प्रक्रिया कारखाने चालू होतील असा अंदाज असून या योजनेंत भातगिरण्या, तेलगिरण्या इ. चे आणखी १२१ कारखानें स्थापन करण्याची तरतूद आहे.

मार्च १९६० च्या अखेरीपर्यंत ६४ साखर कारखाने सुरू होण्याची शक्यता आहे. त्यांच्या भाग भांडवलांत गुंतविण्यासाठी २२ कोटी रु. ची रक्कम वेगळी ठेवलेली आहे. त्याखेरीज मुंबई, म्हैसूर, पंजाब आणि पश्चिम बंगाल या राज्यांत शीतयंत्रांच्या उभारणीसाठी १६ कोटी रु. ची तरतूद करण्यांत आली आहे.

सहकारी मार्केटिंग संस्थांसाठी आणखी २९३ गुदामें आणि ७१३ ग्रामीण विभागांतील गुदामें या काळांत स्थापन करण्यांत येणार आहेत.

## पुणें पोस्टल बँकेंत चर्चा

पुणें पोस्टल को-ऑ. बँक लि. पुणें १ या संस्थेस, पुणें सेंट्रल को-ऑ. बँक लि. चे चेअरमन श्री. शिवाजीराव काळे, एम्. एल्. ए. यांनीं बुधवार दि. ३०-३-६० रोजीं सायंकाळीं ७ वाजतां भेट दिली. त्यांचे समवेत पुणें सेंट्रल को-ऑ. बँकेचे डायरेक्टर्स श्री. भोंडे वकील, श्री. पारखी वकील, श्री. इनामदार व मॅनेजिंग डायरेक्टर श्री- संत हेहि हजर होते. त्यांनीं बँकेचें काम पाहून आनंद व समाधान व्यक्त केलें व मनमोकळेपणानें चर्चा करून बँकेच्या कांहीं अडचणी असल्यास त्या सोडविण्यास मदत करूं असेंहि आश्वासन दिलें.

## नगर डि. अ. सें. को. बँकेचा सुवर्ण महोत्सव

नगर डि. अ. सें. को. बँक लि. चा ५० वा वर्धापन दिन व सुवर्ण महोत्सवाचा प्रथम समारंभ दि. २८ रोजीं मा. कुंदनमल सोभाचंद फिरोदिया, माजी सभापति, मुंबई विधानसभा, ह्यांच्या अध्यक्षतेखाली साजरा झाला. त्याचवेळीं सहकारी मंत्रि ना. श्री. व्यं. शि. भारदे ह्यांच्या हस्तें बँकेचे माजी मॅनेजर कै. म. व. जोशी व माजी जनरल मॅनेजर कै. कृ. ज. जोशी ह्यांच्या तैलचित्रांचें अनावरण झालें.

हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ११५/१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.